# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन व त्यांचे शैक्षणिक कार्य

प्रविण भास्कर गायकवाड
Assistant Teacher,
Z.P. School, Aurangabad
Mo. 9552317299
Email: gaikwadpravin421@gmail.com

**प्रस्तावना -**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. त्याचा योग्य उपयोग झाला पाहिजे, असे डॉ.आंबेडकर यांना वाटत असे. जो समाज अशिक्षित असतो तो शिक्षणा अभावी सर्वस्व गमावलेला असतो. शिक्षणाने माणसात कर्तव्य आणि हक्काची जाणीव निर्माण होते. समाजाच्या सर्व स्तरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे आणि आपल्या शिक्षणापासून वंचित समाजाला शिक्षणाचे महत्व अत्यंत सोप्या भाषेत आणि कळकळीने समजावून सांगतांना बाबासाहेब म्हणत, ”शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.“

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन एका उफाळलेल्या महासागरासारखे होते. आपल्या हयातीत त्यांनी अनेक ग्रंथ, लेख लिहून ठेवले आहे. आज राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिस्थिती झपाटयाने बदलत आहे. आपल्या देशात जातीयवादी, फुटीर आणि आंतकवादी शक्ती डोके वर काढीत आहेत. आत्मनिर्भर आर्थिक व्यवस्था कोलमडून जात असून भाववाढ आणि बेकारीचे फार मोठे संकट सामान्य जनतेवर कोसळत आहे. अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी फुले-शाहू- आंबेडकरांचे विचार समजावून घेऊन, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक समतेचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक झाले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अमेरिकेत 4 वर्षे राहिले. त्यांना उत्तम प्राध्यापकांचे मार्गदर्शनही लाभले. त्यांनी नवा देश पाहिला, नवी संस्कृती पाहिली, नवे ज्ञान अनुभवले, माणसा-माणसातील संबंधाची जाण त्यांना आली. आपल्या भारतीय परिस्थितीशी तुलना करण्यासाठी त्यांना नवे गवसले. भेदभावाची कृत्रिम बंधने नसलेला मुक्त समाज त्यांनी पाहिला. नवे जग पाहून ते भारतात आले. भारतात आल्यावर त्यांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न करण्याचे ठरविले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, याची त्यांना खात्री पटली. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानव वंश शास्त्र, कायदा इत्यादी विविध शास्त्रांचा अभ्यास

केलेला व त्या विषयात पारंगत असलेला शिवाय सामाजिक बांधिलकी मानणारा नेता त्यावेळी दुसरा कोणी नव्हता. त्यांना पर्शियन, संस्कृत, फ्रेंच आणि जर्मन ह्या परदेशी भाषेचेही चांगले ज्ञान होते.

शिक्षणाचे महत्व ओळखणाऱ्या डॉ. बाबासाहेबांनी 20 जून, 1946 साली मुंबई येथे सिध्दार्थ महाविद्यालय आणि 19 जून, 1950 साली औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. डॉ. बाबासाहेबांना कोलंबीया विद्यापीठातर्फे 5 जून, 1952 साली डॉक्टर ऑफ लॉज आणि हैद्राबाद, उस्मानिया विद्यापीठातर्फे 12 जाने. 1953 साली डॉक्टर ऑफ लिटरेचर पदवी अर्पण करण्यात आली.

त्यांचे आयुष्य तीन गुरूंनी घडले. ते बुध्द, संत कबीर, महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहु महाराज यांना आपले गुरू मानत असत. 6 डिसेंबर, 1956 साली दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण झाले. या ठिकाणी फक्त त्यांच्या शैक्षणिक जीवनपटावर प्रकाश टाकण्यात आला. वाचनाच्या संदर्भात विचार, विद्यार्थ्यांच्या संदर्भात शैक्षणिक विचार, अध्यापकाच्या संदर्भात शैक्षणिक विचार, वसतीगृहाच्या संबंधी विचार, मागासवर्गीयांच्या शैक्षणिक तरतूदी, भारतीय संविधानातील सर्वसमावेशक शैक्षणिक तरतूदी इत्यादी स्वरूपाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचाराचा मागोवा या ठिकाणी घेता येईल.

## प्राथमिक शिक्षणा विषयी विचार-

केवळ बाराखड्या शिकवणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर मुलांची मने सुसंस्कृत करणारे दर्जेदार शिक्षण शाळांनी दिले पाहिजे. इतका सुक्ष्म विचार बाबासाहेबांनी प्राथमिक शिक्षणाबाबत केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगिण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कैक शतके लागतील. म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागतो. आघाडीस आलेल्या जगातील सर्व देशांनी सक्तीचा कायदा करूनच लोकांची निरक्षरता हद्पार केली, असे आपणांस दिसून येते. जे वर्ग आधीच शिक्षणाचा लाभ घेतात. त्यांच्यावर शिक्षणासाठी अर्थातच सक्ती करावी लागत नाही. ज्यांना शिक्षणाचे महत्व कळत नाही व जे त्या बाबतीत उदासीन असतात. त्यांच्या करीताच सक्तीच्या कायद्याची आवश्यकता असते. म्हणून या देशात शिक्षणामध्ये मागासलेले जे वर्ग आहेत.त्यांच्या जिव्हाळयाचा हा प्रश्न आहे. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत कायद्याने सक्ती करावी.

## उच्चशिक्षणाविषयी विचार -

जे व्यक्तीसमुह बौध्दीक दृष्ट्या उच्च शिक्षणाचा महत्तम लाभ घेण्यास समर्थ आहेत पण आर्थिक स्थिती योग्य नाही म्हणून किंवा अडचणी आहेत म्हणून असे वर्ग या शिक्षणाच्या लाभापासून वंचित आहेत, त्यांना उच्च शिक्षणाच्या सुविधा पुरविण्यासाठी विद्यापीठ ही प्राथमिक स्वरूपाची यंत्रणा होय, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटते. केवळ लिहीण्यावाचण्याचे ज्ञान पुरेसे ठरणार नाही. तर शिक्षणाच्या उच्च टोकापर्यंत पोहचले पाहिजेत, म्हणजे त्यांच्याबरोबर वाटचाल करून संपूर्ण समाजाचा दर्जा उंचावेल. मिलिंद महाविद्यालयाच्या शिलान्यास प्रकरणी बोलतांना बाबासाहेब म्हणतात, “हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व किती आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते. पण हे चुक आहे. कारण हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे, त्यांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करून पुर्वीप्रमाणे त्यांना उच्च वर्गाची सेवा करण्यास भाग पाडणे नव्हे. खालच्या वर्गाची प्रगती मारून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागत असल्यामुळे त्यांच्यात निर्माण होणारा न्युनगंड नाहीसा करणे, हे खरे शिक्षणाचे ध्येय आहे. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हेच एकमेव औषध आहे.”

## विज्ञान आणि तंत्रज्ञान शिक्षणाविषयी विचार-

उपयोगी शिक्षण म्हणजे विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखातील उच्च शिक्षण होय. परंतू, हेही वास्तव आहे की, अनुसूचित जातीतील बहुतांश लोक त्यांची स्थिती, त्यांच्या जवळ उपलब्ध संसाधने त्यांची कार्यक्षमता यांचा विचार करता विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखातील उच्च शिक्षण यांना खुले होणार नाही आणि याच कारणास्तव केंद्रीय सरकारने यांना या शाखेतील उच्च शिक्षणाकरीता अर्थसहायासाठी पुढे येणे न्याय्य, योग्य आणि आवश्यक आहे. हिंदूस्थानात विद्यापीठात किंवा तत्सम विज्ञान आणि तंत्रशिक्षण संस्थात अनुसूचित जातीतील विद्यार्थी विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखातील उच्च शिक्षण घेत असतील तर त्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती रूपाने हिंदूस्थान सरकारने वार्षिक अनुदान द्यावे इंग्लंड, राष्ट्रकुल राष्ट्र, युरोप आणि अमेरिका येथील विद्यापीठातून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखातील उच्च शिक्षणासाठी हिंदूस्थान सरकारने अनुदान द्यावे.

## विद्यापिठाच्या संदर्भात विचार-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यापीठ शिक्षणाचे ध्येय आणि कार्ये, वर्तमान विद्यापीठ शिक्षण यंत्रणेतील उणीवा, विविध जाती. जमातीत सांस्कृतिक आदान- प्रदान व सलोख्याचे संबंध सुधारण्याबाबत विद्यापीठाची भूमिका, परीक्षानुवर्ती विद्यापीठाला शिक्षणानुवर्ती विद्यापीठात कसे परिवर्तीत करता येईल इ. विषयी विचार मांडले. तसेच उच्च शिक्षण व संशोधन या क्षेत्रात विद्यापीठाचे योगदान, विद्यापीठ, आणि समाज, विद्यापीठ व शासन यांचे परस्पर संबंध आणि विशिष्ट जाती जमातीत विद्यापीठ शिक्षणाच्या प्रचार प्रसारासाठी उपाय योजना इ. विषयी विचार मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यापीठाच्या संदर्भात खालील मौलीक सूचना केल्या.

- ग्रंथालयासारख्या महत्वाच्या प्रश्नांकडे विद्यापीठाने लक्ष द्यावे.
- खाजगी महाविद्यालयावर विद्यापीठाचे नियंत्रण असावे व विद्यापीठामार्फतच खाजगी महाविद्यालयांना अनुदान मिळावे.
- विद्यापीठ फक्त परिक्षा घेणारी यंत्रणा नसावी तर शैक्षणिक कार्य करणारी व्यवस्था असावी.
- पदवीपूर्ण व पदव्युत्तर असे शिक्षणाचे विभाजन न करता दोन्ही प्रकारच्या शिक्षणाची जबाबदारी विद्यापीठाकडे असावी. विद्यापिठाच्या प्राध्यापकाबाबत बाबासाहेब म्हणतात की, "प्राध्यापकांनी अध्यापन आणि अध्ययनात स्वतःला इतके गुंतवून घ्यावे की, आपल्या घराकडेही बघण्याची सवड त्यांना मिळू नये. ते काम त्यांनी त्यांच्या पत्नीकडे सोपवावे. संशोधन करावे, त्याचप्रमाणे प्राध्यापक नुसता विद्वान असून चालत नाही. तर तो बहुश्रुत असला पाहिजे, उत्साही असला पाहिजे. आपला विषय अधिकाधिक माहितीपूर्ण व मनोरंजक करू शकेल, अशी धमक त्याच्याकडे असली पाहिजे."

## नैतिक शिक्षण, शीलसंवर्धन चारित्र निर्मिती शिक्षण-

शिक्षण ही तलवार आहे, शिक्षण हे शस्त्र आहे. जर एखादा मनुष्य येथे तलवार घेऊन आला तर आपण सर्वजण त्यास घाबरून जातो. परंतू, विद्याचे शस्त्र हे नेहमी वापरणा-यावर अवलंबून असते. हत्याराने अबलांचे सरंक्षण मनुष्य करू शकेल. चांगल्या माणसाच्या हातात शस्त्र असणे उत्तम परंतू वाईट माणसाच्या हातात शस्त्र असणे बरे नाही. शिक्षण घेतलेल्या माणसाच्या अंगी शील व सौजन्य नसेल तर तो हिंस्त्र पशुपेक्षाही क्रुर व भीतीप्रद समजण्यात यावा.

## केवळ शिक्षणाने योग्यता येते असे नाही -

केवळ शिक्षण घेतले म्हणजे योग्यता येते, असे वाटत नाही. मनुष्य विद्वान झाला की, तो समाजाला उपयुक्त होतोच असे नाही. विद्वान मनुष्य लुच्या, लबाड, उसण्या आणखी वाटेल त्या दुर्गुणांचा असू शकतो. तेव्हा शिक्षणाबरोबर माणसाच्या अंगी शिल असणे महत्वाचे आहे.

## स्त्री शिक्षण-

स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे. स्त्रियांनी स्वच्छ राहण्यास शिकावे व सर्व दुर्गुणांपासून मुक्त राहावे. तुमच्या मुलांना शिक्षण द्या, हळूहळू त्यांच्या मनात महत्वकांक्षा जागृत करा. ते थोर पुरूष होणार आहेत, असे त्यांच्या मनावर बिंबवा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रिमुक्तीविषयक कार्य हे केवळ उपेक्षित, वंचित घटकातील स्त्रियांपुरतेच मर्यादित नव्हते तर देशातील सर्व स्त्रिवर्गाच्या उध्दाराचे कार्यव्रत त्यांनी घेतले होते. जाती, वर्ग विरहीत स्त्रिवर्गाचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी त्यांनी वेळोवळी आपल्या लिखणातुन, भाषणातुन व चळवळीतुन विचार मांडलेले आहेत. एकूणच भारतीय समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या आयुष्यात विद्यार्थी दशेपासूनच स्त्रिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षण घेत असतांना आपल्या वडीलांचे स्नेही सुभेदार शिवनाक जमेदार यांना न्युयॉर्क वरून 4 ऑगष्ट 1913 रोजी पाठविलेल्या पत्रातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्रिस्वातंत्र्य व स्त्रिशिक्षणाबददलचा उदात्त दृष्टिकोन स्पष्ट होतो.

या पत्रात जमेदारांना ते लिहीतात‘‘We must how entirely give up the idia that parents give “Janma to the child and not” “Karma” They can mould the destiny of their children and if we but follow this principle be sure that we shall soon see batter day and our progress will be greathly accelerated if male education is persued side by side with female education the fruit of which you can very well see verified your own daughter”

अर्थात, आई-बाप आपल्या मुलाला जन्म देतात, कर्म देत नाही, असे त्यांचे म्हणणे ठिक नाही. आई-बाप मुलांच्या आयुष्यात वळण लावू शकतात. ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलीच्याही शिक्षणासाठी धडपड केली, तर आपल्या समाजाची प्रगती झपाटयाने होईल.

पुढे त्यांनी म्हटलं होतं दिन दलितांचं दैन्य संपविणारा एकमेव मार्ग म्हणजे त्यांचे शिक्षण होय. कार्यकर्त्यांनी शिक्षण प्रसारासाठी झटले पाहीजे. त्यांनी या पत्रात शेक्सपिअरच्या नाटकातील खालील

वचन उद्धृत केले होते. प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यात जेव्हा संधीची लाट येते, तेव्हा तीचा योग्य प्रकारे उपयोग केला तर त्या मनुष्यास वैभव प्राप्त होते. डॉ. आंबेडकरांनी सांगितलेला हा शोषणमुक्तीचा मार्ग जणू समाजवादी तत्वज्ञानाचेच नवे रूप आहे, यातून मुलांच्या बरोबरीने मुलींनी शिकावे असा त्यांचा प्रयास दिसतो.

## मुला-मुलींना शिक्षण द्या-

स्त्रियांना उद्देशून, तुम्ही मुला-मुलींना शिक्षण द्या. परंपरागत कामात गुंतवू नका तुम्ही जे काम करता त्या कामात त्यांना पडू न देण्याची खबरदारी घ्या. मुला-मुलींना शिक्षण देण्यात कसरू नका. तुमची मुले शिक्षण घेऊन मोठमोठाल्या पदावर गेली पाहिजे, अशी तुम्ही इच्छा धरली पाहिजे. तुम्ही तुमच्या मुलांना शिक्षण देण्यात कसुर नये. डॉ. बाबासाहेब म्हणाले, तुम्ही तुमच्या मुला-मुलींना शिक्षण द्या. त्यांना खुप खुप शिकवा, त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत बालपणीच त्यांची लग्ने करू नका. कारण शिक्षणच प्रगती करू शकते. शिक्षणामुळेच आचार विचारात बदल होवू शकतो. कारण, शिक्षणातच ती शक्ती आहे. शिक्षण हाच सर्व सुधारण्याचा पाया आहे.

### प्रोफेसरांनी अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाच्या कामी स्वतःला वाहून घ्यावे-

प्रोफेसरांनी अध्ययनाच्या आणि अध्यापनाच्या कामी स्वतःला इतके वाहून घ्यावे की, आपल्या घराकडे बघायला त्यांना जास्त वेळ मिळाला नाही पाहिजे. प्रोफेसरांनी भलती कामे अंगावर घेवून आपल्या जबाबदा-यांचे क्षेत्र उगाच वाढवीत जावे ही गोष्ट डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मान्य नाही. अध्यापन व अध्ययन यामध्ये संशोधनही आलेच. या तीन गोष्टीखेरीज प्रोफेसरांनी दुसरे कोणतेही काम करता कामा नये.

## वाचना विषयी विचार-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, माझ्या पुस्तकाला बेलिफाने हात लावला तर त्याला गोळी घालीन. मी प्रवास करीत असता मजजवळ नेहमी चार पुस्तके व वर्तमानपत्रे असतात. परंतू, प्रवासात जी शिकलेली माणसे दिसतात. त्यांच्या हातात पुस्तके, वर्तमानपत्रे यांच्या ऐवजी सिगारेटच्या पेट्या दिसून येतात.

## वसतीगृहयुक्त शिक्षण-

मागासवर्गीय मुलामुलींसाठी सरकारने वसतीगृहे सुरू करावी. त्यामुळे ज्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. त्यांच्या शिक्षणाची सोय होईल. तसेच, सुशिक्षित स्त्रियांना शिक्षण, नोकरी, उद्योग व राजकीय क्षेत्रात खास आरक्षण असावे.

## विद्यार्थांना शिक्षणाविषयी उपदेश

विद्यार्थांनी चाळीचाळीत जाऊन जनतेचे अज्ञान आणि खुळया समजूती दूर केल्या पाहिजेत. तरच आपल्या शिक्षणाचा जनतेला काही लाभ होईल. ज्ञानाचा उपयोग आपण आपल्या बांधवाची सुधारणा,प्रगती करण्याकरीता केला पाहिजे. तरच भारत उन्नतावस्थेला जाईल, विद्ये शिवाय मानवाला शांतता नाही आणि माणुसकीही नाही. विद्याही सर्वांना अवगत झाली पाहिजे. ती मासागरासारखी आहे. अपुरे विद्यार्जन करून काही उपयोगाचे नाही. परिक्षा कोणीही पास होतो. नुसत्या परीक्षा पास होउन पदव्या मिळविण्यात काही अर्थ नाही. विद्यार्थ्यांनी रचनात्मक कार्य करून दाखविले पाहिजे.

## शिक्षण संघटना/परिषदा-

डॉ.बाबासाहेबांच्या निरीक्षणानुसार शिक्षणाच्या प्रश्नाकडे किंवा विद्यार्थ्यांच्या अडीअडचणीकडे एकाही परिषदेने जास्त लक्ष दिले नाही. विद्यार्थ्यांच्या निरनिराळया संस्था, निरनिराळया राजकीय पक्षांच्या चाकाला बांधलेल्या असतात.

## भावी जीवनाची उभारणी विद्यापीठात होते -

विद्यार्थांनी काय शिकावं हे विद्यापीठ ठरवित असलं तरी आपल्या बौध्दीक विकासाला आपण शिकलो ते खरोखरच पोषक व आवश्यक आहे की नाही, हेही प्रत्येक विद्यार्थ्याने पाहिले पाहिजे. त्यांच्या भावी जीवनाची उभारणी याच ठिकाणी होत असते. तो राष्ट्राच्या आदर्श नागरिक होणार की, त्याचे जीवन विफल होणार हे ही शिक्षणक्रमच ठरविणार असल्यामुळे विद्यापीठाच्या प्रत्येक हालचालीवर विद्यार्थ्यांचे कटाक्षाने लक्ष पाहिजे. विद्यार्थ्याने शिकून नोकरी केली तर त्यात काय पाप. त्याला आयुष्य आहे. त्यामुळे सरकारी नोक-या मिळविण्याचा अटोकाट प्रयत्न करा असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणत. शिक्षित व्हा, चळवळ करा, संघटित व्हा, आत्मविश्वास बाळगा, कधीही धीर सोडू नका. ही जीवनाची

पंचसूत्री आहे. विद्यार्थी वर्गाची शिक्षण संपादनाच्या दृष्टीने परिस्थिती बरीच खालावलेली आहे. परंतू, अलीकडे विद्यार्थी शिक्षणापेक्षा राजकारणातच जास्त दंग असलेले दिसून येतात. हा सुध्दा शैक्षणिक -हास होय. विद्यार्थी जीवनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असलेल्या प्रश्नांकडे त्यांनी अधिक लक्ष पुरवावे.

## स्वतःची लायकी विद्यार्थी दशेतेच वाढवा-

नविन हक्क, मोठ्या नोक-या वगैरे मिळावयाच्या तर त्याला स्वतःची लायकी लागत असते. ती लायकी वाढविण्याचे मुख्य काम विद्यार्थी दशेत तुम्ही करीत असतांना तुम्ही इतर कोणत्याही चळवळीत पडणे चूकीचे होईल, बुध्दीचा उपयोग भाकर, शिक्षण व राज्यसत्ता मिळविण्यासाठी व्हावा.

## शिक्षण प्रसार-

गुणभेदाचे अंतर नाहीसे झाले पाहिजे. त्यासाठी शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे आपण फार जागृत झाले पाहिजे, संधी प्राप्त होणे आणि ती पदरात पाडून घेणे हे आपल्याकडे आहे. शिक्षणाच्या अभावी हे सुसाध्य होत नाही. आज समाजास अत्यंत निकडीचे असे कोणते कार्य असेल तर ते शिक्षण प्रसार हे होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीने तसेच हर एक संस्थेने शिक्षणाच्या बाबतीत आपल्या तरूण पिढीचे पाऊल पुढे कसे पडेल हया प्रश्नांकडे आपले लक्ष पुरविले पाहिजे व त्या अनुरोधाने आपल्या कार्याची दिशा ठरविली पाहिजे

## बहिष्कृत विद्यार्थ्यांच्या कर्तव्यावरच बहिष्कृतांचे भवितव्य-

विद्यार्थ्यांनी आपले कर्तव्य यथायोग्य पार पाडण्यावर बहिष्कृतांचे भवितव्य अवलंबून आहे, असे सांगितले. त्याचप्रमाणे बहिष्कृतातील सुशिक्षित स्त्रियांनीही आपले शील व कर्तव्य सांभाळून समाजाच्या प्रगतीस हातभार लावण्याचा उपदेश केला.

## सिध्दार्थ व मिलिंद महाविद्यालयाची स्थापना-

जी ध्येये गौतमांनी आपल्या शिष्यांपुढे ठेवली होती आणि हीच ध्येय सिध्दार्थ कॉलेज अनुसरणार आहे. 1. सत्य शोधून काढणे व 2. जो धर्म आपल्याला मानवता शिकविलं त्याच धर्माचे अनुसरण करणे. मिलिंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये विद्या, प्रज्ञा, करूणा, शील व मैत्री ही पंचतत्वे रूजविणे, शिकविणे हे ध्येय मिलींद महाविद्यालयाचे आहे. अलिकडील शिक्षण सम्राटांप्रमाणे बाबासाहेबांनी आपल्या शैक्षणिक संस्थेस स्वतःचे नाव दिले नाही. त्यांचे वडील सुभेदार रामजी आंबेडकर व त्यांची आई

भिमाई यांचे नावही आपल्या संस्थेस देवू शकले असते. पण त्यांनी असे केले नाही. तर संस्थेस पिपल्स एज्युकेशन सोसायटी व महाविद्यालयांना सिध्दार्थ, मिलिंद ही नावे दिली. औरंगाबादच्या 150 एकर

मिलिंद कॉलेजच्या परिसरास नागसेनवन असे नाव दिले आहे. पिपल्स, सिध्दार्थ, मिलिंद,नागसेन ही नावे लोकशाही, विचारस्वातंत्र, चिकित्सा व प्रामाणिक, बौध्दीक वादविवादाची प्रतिके आहेत. बाबासाहेबांचे शैक्षणिक कार्य-कर्तृत्व पाहता शिक्षण क्षेत्रात आज जी अराजक सदृश्य स्थिती निर्माण होवून गुणवत्तेची घसरण होत आहे आणि शैक्षणिक संस्था सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून नव्हे तर नफेखोरीच्या दृष्टीकोनातून उभारण्यात येत आहे. ते पाहता, बाबासाहेबांच्या मुल्यगर्भ शैक्षणिक विचारांचे सदोदित मनन-चिंतन होणे गरजेचे आहे.

## ट्रेनिंग स्कूल फॉर एन्ट्रन्स टू पॉलिटिक्स-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबईत जूलै 1956 पासून संसदीय शिक्षण देणारी एक आदर्श संस्था ट्रेनिंग स्कूल फॉर एन्ट्रन्स टू पॉलिटिक्स स्थापन केली होती. त्यात राजकारण,अर्थशास्त्र, अंदाजपत्रक, कामगार संघटना, संसदीय कामकामजविषयक नियम आणि परंपरा इत्यादी आवश्यक विषयाबरोबरच वक्तृत्वसाधनेला प्राधान्य दिले होते.

खुद्द डॉ.बाबासाहेब आंबेडकर या संस्थेचे संचालक होते. डिसेंबर, 1956 मध्ये वक्तृत्वावर व्याख्याने देण्याचे त्यांनी निश्चित केले होते. दुर्देवाने त्यांच्या अकस्मात परिनिर्वाणाने एका प्रभावी वक्त्याच्या मार्गदर्शनाला ही संस्था आणि तिचे उत्सुक विद्यार्थी मुकले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या संविधानात केलेल्या शैक्षणिक तरतूदी-

28 ,1, नुसार राज्याच्या पैशातून चालवल्या जाणा-या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही विवक्षित शैक्षणिक संस्थान धार्मिक शिक्षण अथवा धार्मीक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र आहे.

29 ,2, राज्याकडून चालविल्या जाणा-या किंवा राज्य निधीतून सहाय मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरीकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

30 ,1, धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याच्या व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

30 ,2, शैक्षणिक संस्थांना सहाय देताना राज्य, एखादी शैक्षणिक संस्थाही, धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या एखाद्या वर्गाच्या व्यवस्थापनाखाली आहे. या कारणावरून तिला प्रतिकुल होईल, अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

21 क राज्य हे सहा वर्षापासून ते चौदा वर्षापर्यंत च्या मुलांना, कायद्याने ठरविल्यानुसार शिक्षण देईल.

41- राज्य हे आपली आर्थिक समता व विकास यांच्या मर्यादेत कामाचा, शिक्षणाचा हक्क आणि बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पीडीत अशा व्यक्तींच्या बाबतीत आणि काहीही अपराध नसताना हलाखीचे जिणे ज्यांच्या वाटयाला आले आहे. अशा अन्य व्यक्तींच्या बाबतीत लोकसहायाचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद
करील.

45- राज्य हे बालकांचे वय सहा वर्षाचे होईपर्यतं, त्यांचे संगोपन करण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी तरतूद करील.

46- राज्य, जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवंर्धन विशेष काळजीपूर्वक करील, आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे रक्षण करील.

51- जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने आपल्या अपत्यास अथवा पाल्यास त्याच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते चैदाव्या वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

337- आग्ली भारतीय समाजाच्या लाभाकरता शैक्षणिक अनुदानाबाबत विशेष तरतूद

350 क - प्रत्येक राज्य आणि राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकारी भाषिक अल्पसंख्याक समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहील आणि अशा सोयी पुरवणे शक्य व्हावे, यासाठी राष्ट्रपती स्वतःला आवश्यक किंवा योग्य वाटतील असे निर्देश कोणत्याही राज्याला देवू शकेल.

371 ड - ससंदेला आंध्रप्रदेश राज्यात केंद्रीय विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी
कायद्याद्वारे तरतूद करता येईल

## निष्कर्ष-

- सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, नैतिक मुल्ये विद्यार्थ्यात बाणवून त्यांचे चारित्रसंवर्धन करता येते. तसेच या शैक्षणिक विचाराने लोकशाही बळकट करता येते.

- स्वांतत्र, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, अखंडता, न्याय या गोष्टी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणाच्या विचारातून दिसून येतात.

- शिक्षण हीच ख-या अर्थाने जीवनाच्या प्रगतीकरीता महत्वाची बाब आहे. स्त्री-पुरूष समानता हे गुण डॉ. बाबासाहेबांच्या शैक्षणिक विचारातून प्रकर्षाने जाणवतात. तसेच, शैक्षणिक विकास करणे, हे प्रत्येक नागरीकांचे कर्तव्य, हक्क आहे हे या विचारातून दिसून येते. तसेच, शिक्षणातील विषमता, आर्थिक विषमता या विचारातून कमी होवू शकते.

## सारांश-

या सर्व बाबीवरून स्पष्टपणे दिसून येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन किती प्रगल्भ होता, हे यावरून समजते. घरातील स्त्री शिकली तर संपूर्ण कुटूंब हे सुशिक्षित होते, हा त्यांचा त्यावेळेचा दृष्टीकोन आजही शंभर टक्के लागू पडतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फक्त एकाच जातीतील स्त्रीचा विचार केला नाही तर संपूर्ण जाती धर्मातील स्त्रींयाकरीता त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य केले. संबंध माणवजातीचे कल्याण शिक्षणातच आहे असा त्यांचा दृष्टीकोन होता. डॉ. आंबेडकरांची भारताच्या भवितव्यावर प्रगाढ निष्ठा होती. परिस्थिती अनुकूल असेल तर या जगातील कोणतीही शक्ती भारताला एकात्म होण्यापासुन प्रतिबंधित करू शकणार नाही, असा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दृढविश्वास होता. यामध्येच डॉ.बाबासाहेबांचे शैक्षणिक विचार दिसून येतात.

# Reference

1) Dr. Babasaheb Ambedkar Written by Dhananjay Kir 1981 3rd Edition.

2) Lokrajya – Oct 2006.

3) Dr. Babasaheb Ambedkar Writings and speeches Vol. 18 Part 1 – Education Dept. Maharashtra (2002)

4) Dr. Babasaheb Ambedkar Writings and speeches Vol. 18 Part 2 – Education Dept. Maharashtra (2002)

5) Dr. Babasaheb Ambedkar Writings and speeches Vol. 18 Part 3 – Education Dept. Maharashtra (2002)

6) Dr. Babasaheb Ambedkar Writings and speeches Vol.-19 – Education Dept. Maharashtra (2005)

7) Dr. Babasaheb Ambedkar Writings and speeches Vol.-20 – Education Dept. Maharashtra (2005)

8) Dr. Babasaheb Ambedkar – Vasant Moon – Translated by Asha Damle – National Book Trust, India New Delhi – Reprinted – 2004,2007

9) The constitution of India (upto and including the 94th Amendment) (asmodified upto 12th June 2006) – Sixth Edition -2007 Government of India.